# प्रो.राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, बडनेराला 'एनआयआरएफ'च्या यादीत स्थान

## विद्यापीठातील एकमात्र इंजिनिअरिंग महाविद्यालयाला हा मान

**अमरावती ■ नगर प्रतिनिधी**

विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीद्वारा संचालित प्रो.राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, बडनेरा या महाविद्यालयाने नुकत्याच जाहीर झालेल्या NIRF (National Institutional Ranking Framework) च्या यादीत पहिल्या ३०० टेक्निकल महाविद्यालयांमध्ये स्थान पटकावले आहे. अशी कामगिरी करणारे हे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील एकमात्र इंजिनिअरिंग महाविद्यालय ठरले आहे.

विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी, अमरावती या संस्थेचे प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, बडनेरा ही मध्य भारतातील तंत्रज्ञान संस्था आहे. १९८३ मध्ये स्थापन झालेल्या या महाविद्यालयाचे महाराष्ट्रातील सर्वोच्च तंत्रज्ञान महाविद्यालयांमध्ये प्रतिष्ठित स्थान आहे. महाविद्यालय हे National Assessment and Accreditation Council (NACC), Bangalore द्वारे ग्रेड 'ए'ने सन्मानित आहे. तसेच महाविद्यालयाला National Board of Accreditation (NBA), New Delhi द्वारा तीनवेळा मानांकन प्राप्त झालेले आहे. महाविद्यालय संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीशी संलग्नित असून एम.बी.ए. आणि एम.सी.ए. सारख्या पी.जी. अभ्यासक्रमांसह मेकॅनिकल अभियांत्रिकी, संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी आणि सिव्हील अभियांत्रिकीचे यु.जी., पी.जी. आणि पीएच.डी. अभ्यासक्रम शिकवत आहेत. महाविद्यालय एक उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण, पायाभूत सुविधा, मूल्याभिमुख शिक्षणासह सुविधा पुरवत आहे. आधुनिक जगाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी योग्य वृत्ती बाळगण्यासाठी निःसंशय प्रत्येक विद्यार्थी पुरेसा विकसित केला जात आहे. यामुळे प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, बडनेरा हे मध्य भारतातील सर्वाधिक पसंतीचे अभियांत्रिकी महाविद्यालय बनले आहे. अमरावती विभागात बहुसंख्य प्रमाणात प्लेसमेंट करणारे महाविद्यालय म्हणून प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, बडनेराची ओळख आहे.

विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे अध्यक्ष नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड.उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.(डॉ.) हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारीणी सदस्य, शंकरराव काळे, नितीन हिवसे, सौ.रागिनीताई देशमुख, डॉ. सौ.वैशालीताई धांडे, डॉ.सौ.पुनमताई चौधरी, प्राचार्य डॉ.ए.पी.बोडखे यांनी विद्यार्थ्यांचे, प्राध्यापकांचे, तसेच महाविद्यालयाच्या सर्व घटकांचे कौतुक केले.